MHKO180003372023

**नियमित दिवाणी दावा क्र.९१/२०२३ मधील निशाणी क्र.५२ खालील आदेश.**

**[सागर आण्णासाहेब माळी वि. आण्णाप्पा उर्फ आण्णासाहेब रुमाण्णा माळी व इतर]**

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादी यांच्या कथनानुसार, प्रस्तुत दावा दाखल करीत असतेवेळी दावा मिळकत १(अ)(२) मधील वर्णनामध्ये ''०.२०.५०'' या ऐवजी ''०.२०'' आणि दावा मिळकत १(अ)(३) मधील वर्णनामध्ये ''हे. ०.८२ आर यापैकी क्षेत्र हे. ०.४१ आर'' या ऐवजी ''०.२०'' आणि आकार रु. पै. ''३.७८'' या ऐवजी ''१.८९'' असे नजरचुकीने नमुद करण्यात आले आहे. तसेच, दाव्यातील परिच्छेद क्र.९ व १० यामध्ये प्रस्तुत अर्जामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे चुकीचा मजकूर समाविष्ठ करण्यात आला आहे. सदरची चुक नजरचुकीने आणि टंकलेखनातील दोषामुळे झाली असून उक्त चुक वादी यांना दावा दाखल केल्यानंतर अवगत झाल्यामुळे त्याबाबत दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्याकरीता वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याची वादी यांनी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

०४. उभयपक्षांच्या विद्यमान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. उभयपक्षांतर्फे त्यांच्या कथनानुरुप युक्तिवाद करण्यात आला.

०५. प्रस्तुत अर्ज आणि त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे यांचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुत दावा दाखल करीत असतेवेळी प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे वादी यांच्या नजरचुकीने व टंकलेखनातील दोषामुळे दावा मिळकत १(अ)(२) व १(अ)(३) आणि परिच्छेद क्र.९ व १० यामध्ये अनावधानाने नमूद करण्यात आलेल्या मजकुराच्या अनुषंगाने प्रस्तावित दुरुस्ती करण्याकरीता वादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादी यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे संपूर्ण निराकरण होण्यास मदत होणार आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही

दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, वादी यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपाचे कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

:: **<u>आदेश</u>** ::

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये प्रस्तुत अर्जातील नमुद दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्ती प्रत प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल करावी. तसेच, दुरुस्त दाव्याची एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. उभयपक्षांनी आपापला खर्च सोसावा.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.16 17:59:06 +0530

दिनांक : १६.०३.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुरुंदवाड.